# भौरद येथे सायबर शिक्षिका व सायबर सुरक्षा विषयावर कार्यशाळा

देशोन्नती वृत्तसंकलन...

**भौरद** ■ जि. प. प्राथ शाळा भौरद येथे सायबर शिक्षीका व सायबर सुरक्षाबाबत कार्यशाळा संपन्न झाली. यामध्ये सायबर क्राईम आणि त्याचे प्रकार, सोशल मीडियाच्या माध्यमातून ऑनलाइन गुन्हे कसे वाढत आहेत. इंटरनेट आणि मोबाईलच्या माध्यमातून होणारे फ्रॉडस, फसव्या वेबसाइट्स आणि त्याद्वारे कशी फसवणूक होते. याबाबत अकोला येथील 'शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाच्या रोशनी वांडे आणि रेणुका नाळे या विद्यार्थिनींनी महत्त्वपूर्ण आणि उत्कृष्ट मार्गदर्शन केले आणि अशी ऑनलाइन फसवणुक होऊ नये, म्हणून कोणती काळजी घ्यावी याविषयी सविस्तर माहिती या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना देण्यात आली. यामधे विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यात आली आणि शंकांचे निरसन केले. यावेळी मोबाइल आणि सायबर सेक्युरीटी विषयी शपथ घेण्यात आली.

ही कार्यशाळा शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय अकोला यांच्या सहकार्याने व 'क्विक हिल फाउंडेशन, पुणे' आणि 'महाराष्ट्र सायबर सेल, मुंबई' यांच्या सहयोगाने आयोजित केली होती. या कार्यशाळेला माणिकराव सरदार केंद्रप्रमुख भौरद, रेखा तायडे



मुख्याध्यापिका यांचे मार्गदर्शन मिळाले. कार्यशाळेचे उद्घाटन केंद्रप्रमुख माणिकराव सरदार यांनी केले. यावेळी लीना भाकरे, उज्ज्वला शर्मा, पुष्पा बोरसे, मीरा डिघोळे, अरविंद गाडगे, चंद्रशेखर चतारे हे शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यशाळेचे संचालन लीना भाकरे यांनी केले तर उज्ज्वला शर्मा यांनी आभार व्यक्त केले. विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.